

# रंग गहिरेसे...

सविता नाबर

# रंग गहिरेसे

## कथा



## सविता नाबर

ई साहित्य प्रतिष्ठान

# रंग गहिरेसे

लेखिका : सविता नाबर

savitanabar@gmail.com

8149658022

302, NABAR SANKUL,

5th Cross Main Road,

Rajarampuri, Kolhapur 416008

ब्लॉग : https://savitanabar.blogspot.in/



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १७ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



## अर्पणपत्रिका

माझ्या या कथांचा प्रेरणास्त्रोत असणारी

माझी मैत्रीण

नीलिमा बोन्द्रे हिला

सप्रेम अर्पण

# मनोगत :



वाचाल तर वाचाल हे ब्रीद कळण्याआधी उमगले. याला कारणीभूत माझे वडील श्री. आ. बेकनाळकर. त्याना वाचनाची अत्यंत आवड. त्यामुळे ते अनेक पुस्तक विकत घ्यायचे. स्वत:च्या पुस्तक संग्रहाबरोबर मी ग्रंथालयही पिंजून काढायची. लग्नानंतर माझ्या वाचनात आणखीनच भर पडत गेली ती माझ्या वाचनवेड्या नवऱ्यामुळे. आणि वाचनाबरोबरच माझ्या लेखनाचा मात्र गंभीर विचार माझ्या पतीने, कौस्तुभने माझ्या मनात भरवला. दिसामाजी काहीतरी लिहित जावे. या उक्तीप्रमाणे, लिही लिही आणि लिही याचा त्याने पाठपुरावा केला. माझ्या कुठल्याही साहित्यकृतीचा पहिला वाचक आणि टीकाकार माझा नवरा असतो. वाचनाचा पाया होताच. पण लिहिण्यामुळे विचार करण्याची कुवत हळूहळू वाढत गेली. विजय तेंडूलकर, जयवंत दळवी, श्री. ना. पेंडसे, जी ए. कुलकर्णी, ओ हेन्री, गाय द मोपांसा, सॉमरसेट मॉम यांच्यासारख्या अनेक चांगल्या लेखकांच्या विचारांचा, शैलीचा मनावर, बुद्धीवर झालेला परिणाम माझ्या हातून काही लिखाण घडवू लागला. यामध्ये लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, पुण्यनगरी, लोकमत या वृत्तपत्रामध्ये स्तंभलेखन केले. दिवाळी अंकांसाठी अनेक मुलाखती घेतल्या, कथा, ललितलेख लिहिले. नऊ पुस्तके प्रकाशित झाली.

आणि आता हे पहिले ई बुक प्रकाशित करताना मला खूप आनंद होतोय. हा कथासंग्रह सध्याच्या तरुण पिढीची वाचनाची गरज, जाणीव आणि आवाका हे लक्षात घेऊन लिहिलेला आहे. तरुण पिढीला वाचनाची आवड नाही असे मी मुळीच

म्हणणार नाही. पण ज्या प्रमाणात पूर्वी वाचनासाठी वेळ देता येत होता तेवढा वेळ आजकाल मुलांकडे उपलब्ध नसतो. त्यामुळे यातल्या कथा कमी लांबीच्या म्हणजेच पर्यायाने अगदी लहान, थोडंक्या वेळेत वाचून होणाऱ्या आहेत. पण वाचकाला काही मिळवून देणाऱ्या आहेत असे मला वाटते. पुस्तकाची हार्ड कॉपी मिळवून वाचण्यापेक्षा इंटरनेटवर सहज उपलब्ध होणारे ई बुक वाचकाना नक्कीच आवडेल अशी आशा आहे. यासाठी माझ्या कथासंग्रहाला ग्रीन सिग्नल देणारे आणि तुम्हा वाचकांपर्यंत पोचायला सर्वतोपरी मदत करणारे ई साहित्य प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, संपादक मंडळ, चित्रकार या सर्वांचे मी मनापासून आभार मानते.



रंग गहिरेसे हे शीर्षक देण्यामागे मला असं वाटतं कि आपले आयुष्य अनेक रंगांनी भरलेले असते. काही फिकट, काही गडद तर काही रंग गहिरे असतात, जे मनाला स्पर्शून जातात, विचार करायला लावतात, पुन्हापुन्हा पहायला उद्युक्त करतात. अशा गहिऱ्या रंगांच्या या कथा वाचकांना कशा वाटल्या ते जाणून घ्यायला मी उत्सुक आहे.

कृपया आपल्या प्रतिक्रिया मला आवर्जून कळवा.

सविता नाबर

savitanabar@gmail.com

8149658022

302, NABAR SANKUL,

5th Cross Main Road,

Rajarampuri, Kolhapur 416008

# कथा- अनुक्रम



1. माप भरलं
2. बोच
3. कंपॅनियन
4. छोटीसी आशा
5. हुकलेला नेम
6. बूमरँग
7. घरोंदा
8. जीवनदाता
9. गीत अधुरे राहिले.........
10. हिशोब
11. नीयत
12. येरे येरे पावसा
13. रिश्ता
14. भाग्य
15. आपलं माणूस

या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक आहेत.

यातील सर्व पात्रे, नांवे, प्रसंग आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचे कोणत्याही जीवित अथवा मृत व्यक्तीशी साम्य आढळून आल्यास

तो निव्वळ योगायोग समजावा.

# माप भरलं

चिटणीस बराच वेळ विचार करत आरामखुर्चीत पडले होते. आशुतोषच्या बायकोला म्हणजे त्यांच्या सुनेला मॅटर्निटी होममध्ये सकाळीच नेलं होतं. तिचं बाळंतपण सोपं नाही असं डॉक्टरानी सांगितलं होतं. मधेच सातव्या महिन्यात बाळाचे नाडीचे ठोके लागत नाहीत असेही कळाले होते. देवा तिला सुखरूप यातून बाहेर पडू दे अशी देवाला त्यांची आळवणी चालली होती. बाळ हाती पायी व्यवस्थित असेल ना म्हणून काळजी वाटत होती. या क्षणाला मनात नाही नाही ते विचार येत होते. कुणाचं बाळ एबनोर्मल झालं, कुणाचं प्रीमॅच्युयर झालं, तर कुणाच्या बाळाला जन्मत:च हृदयाला भोक होतं. एक ना अनेक विचार चिटणीसांना हैराण करत होते.

लोन प्रकरणी देसाईनी त्यांची खूपच मनधरणी केली होती. पण चिटणीस तसूभरही हटायला तयार नव्हते. आजवर अगदी किरकोळ रकमेत ते कुणाचंही काम करून देत होते. पण देसाई चांगले सुखवस्तू आहेत आणि दोन लाख देणे त्यांना काही अशक्य नाही हा चिटणीसांचा होरा होता. तेवढे देणं शक्य नाही असं पुन्हा पुन्हा देसाई म्हणत होते. पण चिटणीसांचा त्यावर विश्वास बसत नव्हता. शेवटी मारून मुटकून का होईना चिटणीसांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळाला होता. त्यानंतर चार वर्षातच देसाई रस्त्यावर आले. त्यांची आर्थिक परिस्थिति हलाखीची झाली आणि घरची मंडळी अन्नाला मोताद झाली. ज्या कामासाठी त्यांनी कर्ज काढले होते ते प्रकरण निकालात निघाले. आणि दारिद्र्याचे दशावतार

याच जन्मी भोगावे लागले. आपल्यामुळेच असे झाले असं चिटणीसांना राहून राहून वाटत होतं. तेव्हापासून त्यांच्या जीवाला चैन नव्हती. एकदा तर एक फाटका माणूस एका गाडीखाली येतायेता वाचला. नंतर बघितलं तर ते देसाई होते. गर्दीतून त्यांनी देसाईंची नजर टाळण्यासाठी कधीच पळ काढला होता. त्यांच्या परिस्थितीला आपणच कारणीभूत आहोत असं मात्र त्यांच्या मनाने घेतलं होतं.

कुठेतरी त्यांनी ऐकलं होतं की बापाने केलेली पापं मुलाला भोगायला लागतात. आणि मनात घर केलेला चिंतेचा हा भुंगा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. लोकांची काम करताना चिटणीसांच्या अपेक्षा पूर्ण होत होत्या पण त्याची त्यांच्या कुटुंबीयांना कल्पना नव्हती. हळूहळू पापाचा ढीग वाढतच गेला होता. मनावरच दडपण वाढत होतं म्हणून आता त्यांनी ठरवलं होतं, देसाईंची केस शेवटची. त्यानंतर काही वर्षातच चिटणीस निवृत्त झाले. पण जाता जाता मोठा हात त्यांनी मारला होता.

नातवंडाच्या बातमीच्या प्रतीक्षेत त्यांचा डोळा केव्हा लागला कळलंच नाही. दाराच्या बेलच्या आवाजाने त्यांना जाग आली. बाहेर काळोख दाटला होता. दिवा लावण्यासाठी ते उभे राहिले, क्षणभर त्यांच्या हृदयाचा ठोकाच चुकला. आपले नातवंड जन्मत: अपंग आहे हेच कानावर पडणार या आभासाने त्यांचा उभा देह क्षणभर थरारला आणि धाड्कन जमिनीवर कोसळला. आणि नवजात गोंडस नातवंडाच्या आगमनाची, आनंदी वार्ता सांगणारी दाराची बेल वाजतच राहिली.

# बोच



त्याच्या आईच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा अगदी दिमाखात पार पडला. स्टेजवरची अत्यंत आत्मविश्वासू, करारी मुद्रेची देखणी मूर्ति नीरज मनात साठवत होता. या क्षणी त्याला आपल्या आईचा खूप अभिमान वाटत होता. घर, कुटुंब सांभाळून, घरचे दारचे नातेवाईक सांभाळून आई किती समर्थपणे लेखन करू शकते या भावनेने त्याचा उर भरून आला. उषाताईंनी उत्तरादाखल केलेले भाषणही उचित आणि एखाद्या प्रगाढ व्यासंगी व्यक्तीचे असावं तसेच होते.

गाडीत नीरज आणि उषाताईंच्या, पुस्तकावर भरभरून गप्पा झाल्या. कोण किती कौतुकाचं बोलले याबद्दलही चर्चा झाली. नीरजला आईचा लेखनाचा वारसा आला नव्हता तरी त्याला वाचनाची आवड मात्र खूप होती. घरी आल्यावर दार उघडणाऱ्या विनायकरावांकडे बघून मात्र त्यांचा संतापाचा पारा चढला. त्या त्यांना घालून पाडून बोलायला लागल्या. क्षणभर नीरज अवाक झाला. त्यांचं असलं कुजक बोलणं नीरजला नवीन नव्हतं. पण इतक्या आनंदाच्या क्षणी तरी आईने आपला तोल सोडता नये होता असं त्याला वाटून गेलं. बिचारे बाबा मान खाली घालून ऐकत होते. थोड्या वेळाने ते आत निघून गेले. नक्कीच पत्त्याचा डाव मांडून बसले असणार. आईने जेवढे वाक्ताडन करायला नको होते तेवढीच चूक बाबांचीहि

होतीच की! त्यांनी कधीच आईला कौतुकाची, शाबासकीची थाप दिली नव्हती. ती हिरमुसली होतच असणार ना!

बाबा लहानपणी फिरायला घेऊन जायचे. आपलं थोडंबहुत कौतुक करायचे. पण आईसाठी त्यांनी कधी काही आणलं नाही. अंधुकसं आठवतं, जोशीकाका आले की बाबा आपल्याला फिरायला घेऊन बाहेर जायचे. काका आले की आईसुद्धा खुश असायची. पण बाबांनी कधी याबद्दल नापसंती दर्शवल्याच त्याला जाणवलं नव्हतं. तरी आई बाबांच्यावर का चिडायची? एकदा जोशी काकांनी आईला साडी दिली. ती तिला आवडली, पण तिला आनंद न होता दु:खच झालं. त्या दिवशी तर आईच्या रागाचा कळसच झाला. तिने पेला फेकून बाबांना मारलं. खरंतर डोळाच फुटायचा. पण थोडक्यात निभावलं. या माणसाशी माझं लग्न का करून दिलं? मी पुरती फसले म्हणून हताश होऊन ती रडली. आईच वागणं गोंधळात टाकणारं तर बाबांच वागणं कोड्यात टाकणारं.

पुस्तक प्रकाशनानंतर बाबा जे न्यूमोनियाने आजारी पडले ते त्यातून उठलेच नाहीत. चेहऱ्यावर कधीच हास्याची खूण नसताना शेवटच्या काही दिवसात मात्र ते अगदी मनापासून हसत होते. तेव्हाही आई अलिप्त होती. शेवटपर्यंत नीरज त्या दोघांच्या वागण्याचा छडा लावायचा प्रयत्न करत होता. एक दिवस बाबांना जोराचा ठसका लागला. वरचा जीव वर आणि खालचा खाली अशी अवस्था झाली. पण थोड्या वेळाने सगळं व्यवस्थित झालं आणि बाबांना वाचा फुटली. कधी नव्हे ते बांध फुटल्यासारखे बोलत राहिले.

"तुझ्या आईचा माझ्यावरचा राग अगदी योग्य आहे रे. आयुष्यात कुठल्याच प्रकारच सुख मी तिला देऊ शकलो नाही. ऐन तारुण्यात ना मानसिक सुख दिल ना आर्थिक ना शारीरिक. पण काय करू माझ मन प्रत्येक गोष्टीसाठी कच खायचं रे. कुठचंही पाऊल उचलायची भीती वाटायची. आई लहानपणी गेली. आणि वडिलांच्या घरातल्या अस्तित्वाला काही अर्थच नव्हता. ते दिवसभर नोकरी आणि नंतर पत्ते खेळायला क्लबात जायचे. त्यांचं ना माझ्या शाळेकडे लक्ष होतं ना माझ्या वाढीकडे. आजी बिचारी काय काय म्हणून पाहणार. मला जेवण खाण व्यवस्थित मिळायचं तिच्यामुळे एवढंच. धाकटा काका माझे लाड करायचा. त्याचे ते कौतुक करणं नव्हतं तर मनमानी असायची. त्याला हवं ते, तो म्हणेल तेव्हा द्यायला लागायचे. प्रत्येक वेळी मी मरण भोगत होतो. मन मारलं जात होतं. माझं बालपण त्यात कधी आणि कसं करपून गेलं ते समजलंच नाही. नंतर कळलं तरी काही उपयोग नव्हता. मनान मी खूपच भित्रा झालो होतो. माझ्यामध्ये उठून दोन हात करण्याची ताकद नव्हती. लग्न झालं. वाटलं होतं मला मनातलं सांगायला साथी मिळाला. मला आनंद झाला खरा पण मी माझ्या बायकोला सांभाळू शकेन का, तिला निभावू शकेन का हा प्रश्न मनात घोंघावायचा. या मनाच्या संभ्रमावस्थेत मला तुझ्या आईशी धडपणे संसारही करता आला नाही. तिला मी खुश ठेवू शकलो नाही. पहिल्यांदा ती रडायची. दैवाला दोष द्यायची. पण तिच्या बोलण्याला, वागण्याला, रडण्याला मला समजावता आलं नाही. मी कमी पडत गेलो आणि नंतर नंतर तर तिनं बोलावं आणि मी ऐकून घ्यावं हाच व्यवहार झाला. मनातून मला तिच खूप कौतुक वाटायचं. पण घडा घडा मला ते बोलून दाखवता आलं नाही. आता आयुष्याच्या या वळणावर या सगळयाचा कबुलीजबाब देऊन काही उपयोग नाही हे मला समजतय. पण माझ्या वागण्याचा थोडाफार अर्थ तुला कळावा हाच हेतु. इतक्या वर्षात मला हे सांगण्याचा खरच धीर झाला नाही रे. पण आता माझ्याकडे फार वेळ नाही. माझ्याविषयी तुझ्या मनात काही अढी राहू नये. माझं

वागणं चुकल ही बोच कायमची मनाला लागू नये म्हणून हे सांगण्याचा माझा प्रयत्न आहे, बस्स.”

नीरज कोड उकलल्यासारखा डोळे मोठ्ठे करून ऐकत राहिला. भूतकाळात झालेल्या एकेक घटनेचा आता तो अर्थ लावायला बघत होता. आता आईच्या आग पाखडण्याचे मूळ त्याच्या लक्षात आले होते. काळ बराच पुढे आला होता. आई बाबांचा संसार जरी आतापर्यंत व्यवस्थित झाला नाही तरी दोघांमध्ये पूल बांधायला नक्कीच आपल्याला जमेल. बाबांना बोलतं करू, आईलाही चुचकारून, समजावून सांगू अशा आशा त्याच्या डोळयात दिसत होत्या. अजूनही आपण काही करू शकू या इराद्याने नीरजने बाबांना हाक मारली. पण बाबांच्या उघड्या डोळयातून त्यांचा प्राणपक्षी केव्हाच उडाला होता.

# कंपॅनियन



रेवतीच्या साठीचा समारंभ थाटामाटात पार पडला. तिच्या दोन्ही मुलांनी काही करायचं बाकी ठेवलं नव्हतं. आईला काय आवडतं आणि काय नाही हे दोघाना चांगलं माहित होतं. त्यासाठी त्यांनी जोरदार तयारी केली होती. खूपसं तिच्यासाठी सरप्राईझच होतं. स्वत:साठी काही करण्याची, करवून घेण्याची तिला हौस राहिली नव्हती. तिच्या वयाच्या पन्नाशीत नवरा मुकुंद गेला आणि ती एकटी पडली. खाजगी कंपनीतली नोकरी तिने पाच वर्ष पुढे चालू ठेवली. आर्थिक सुबत्ता होती तरीही. मनाला विरंगुळा म्हणून. मुलांची शिक्षण झाली होती. सुकुल एका जाहिरात संस्थेचा सर्वेसर्वा होता. सुमेधा एमबीए होऊन चांगल्या कंपनीत उच्च पदावर काम करत होती.

समारंभ संपता संपता रेवतीने आपले मित्र, बिपीन प्रधान यांच्याशी मुलांची ओळख करून दिली होती. आपले कंपॅनियन म्हणून! इथेच मुलांच्या चेहऱ्यावर पहिल्यांदा प्रश्नार्थक आणि नंतर नाराजीचे भाव उमटलेले तिला क्षणात जाणवले. मुलांनी दिलेले सरप्राईझ तिला आवडले होते पण तिने दिलेले सरप्राईझ मात्र मुलाना आवडले नव्हते. तिला मनापासून जपणारी मुल या बाबतीत मात्र नाखूष होती. समारंभानंतर सुकुलने आपली नाराजी व्यक्त केली होती. घरात धुसफूस झाली होती. शांतपणे तिने विचार केला. प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा तिने पत्रातून लिहायचे ठरवले.

“प्रिय सुकुल आणि सुमेधा,

या वयात मी नवीन जोडीदार शोधला म्हणून तुम्ही दोघेही माझ्यावर रुष्ट आहात. जे साहजिकच आहे. त्याबद्दल मी तुम्हाला दोष देत नाही. तुमच्या डॅडींना मी विसरले असे तुम्हाला वाटले असेल. पण नाही, त्यांची स्मृती तर माझ्या मनात चिरंतन आहे. तुमचे डॅडी नेहमी आपल्याला आनंदी रहायला सांगायचे. मीही कधी दु:खात राहू नये असे त्याना वाटायचे. म्हणूनच तर त्यांनी आपल्या माघारी मी सवाष्णसारखे राहावे असे वचन घेतलं होते. पण बराच काल त्यांच्या मृत्युच्या छायेतून मी बाहेर पडू शकले नव्हते. वर्षभरापूर्वी बिपिन सारखा मित्र माझ्या आयुष्यात आला आणि जीवनाकडे सकारात्मक बघण्याची दृष्टी पुन्हा एकदा नव्याने जाणवली. या वयात सगळयात महत्वाचं मला वाटत ते म्हणजे विचारांचं शेअरिंग, आवडी निवडीचे आदान प्रदान. एकमेकाना जपणं. एकमेकांच्या भावनाना जाणीवपूर्वक मान देणं. बिपीनच्या सहवासात पुन्हा एकदा साहित्य संगीताचा आस्वाद घेताना आयुष्यात रस वाटायला लागलाय. संसारातले अनुभवांचे अनेक पावसाळे दोघांनीही पहिले आहेत त्यामुळे तरुणपणाचा उच्श्रुंखलपणा आमच्यात खचितच नाही. हा माझा निर्णय भावनिकपेक्षा मी व्यावहारिक पातळीवर जास्त घेतला आहे.

सुकुल आणि सुमेधा तुम्ही सुजाण आहात. समजूतदार आहात. आपापल्या संसारात सुखी आहात. तुम्ही तुमच्या संसारात पूर्णपणे मश्गुल असताना माझ्यासाठी कधी कधी वेळ काढणं कदाचित तुम्हाला शक्य होणार नाही. जसजसे वय वाढते तसा आपल्या आजारपणात, हट्टामधे हक्काच्या माणसाला आपण त्रास

देऊ शकतो. त्यासाठी अपराधी वाटत नाही. याचा अर्थ असा नाही कि तुम्ही माझं काही करणार नाही. पण वयामुळे मागे लागणाऱ्या व्याधिना तोंड द्यायला साथीदाराच्या भरभक्कम आधाराचीच गरज असते.

काही गोष्टी सांगताना आपल्यामध्ये दोन पिढीच्या विचारांमधली तफावत असू शकते. त्यामुळे जे काही मी माझ्या समवयस्क व्यक्तीशी बोलू शकेन अशी जवळची व्यक्ती असावी असं मला वाटलं. शिवाय तुमच्या संसारात तुम्हाला हवी तशी स्पेस देण मला कधी जमणार, तर जेव्हा मी माझ्या जगात असेन. मी जर सर्वार्थान तुमच्या कुटुंबात गुरफटले तर माझं विश्व काहीच न रहाता तुमच विश्व हेच माझं भावविश्व होऊन जाईल. आपल्यामध्ये निर्णय घेण्यासाठी थोडीशीही जागा रहाणार नाही. आपले रक्ताच्या नात्याचे बंध जवळचे असले तरी श्वास घ्यायला सुद्धा नाकासमोर थोडी जागा रिकामी हवी ना!

आपल्या कुटुंबात आपण एकमेकांच्या निर्णयाचा मान नक्कीच राखतो. तुम्ही दोघेही तो राखाल अशी मला खात्री आहे. माझ्या या निर्णयाने मी तुमच्यापासून लांब जात नाहीये तर मित्रत्वाच्या नात्याने आपण जवळच आहोत.

सदैव तुमचीच,

ममा”

# छोटीसी आशा



चिऊची अखंड बडबड चालायची. “शनिवारी आई माझी वाट बघते गं. मला घरी जायलाच हव. माझ्या आवडीची सडून केलेल्या गव्हाची खीर असते. मला आवडणारा बटाट्याचा झटपट रस्सा, सगळं कसं अगदी मस्त तयार असतं. मी एसटीतून जाताना डोळे बंद करून जाते आणि बंद डोळयासमोर फक्त जेवणाचा समाचार घेत असते. आमचं गाव आलं की डोळे उघडते. स्टँड वरुन चालत जेमतेम पाच मिनिटांच चालण्याच अंतर. गेल्यावर हातपाय धुवून लगेच पाटावर. माझी आई सुगरण आहे. मला काही काम करू देत नाही. मी लांब राहून शिकते ना! आईला माझ्या शिक्षणाचं खूप कौतुक आहे.” हॉस्टेलवरुन निघाली की चिऊच्या एका डोळयात हसू आणि दुसऱ्या डोळयात आसू असायचे.

“चिऊ, तू किती भाग्यवान आहेस गं! मला तुझा खूप हेवा वाटतो.” मैत्रीण नेहमी म्हणायची. यावेळीही चिऊ नित्यनेमाने आपल्या गावाकडे जायला निघाली. तिची मैत्रीण यावेळी तिच्या पाठीसच लागली, “मीही येणार. मला वाटलं, तू म्हणशील माझी आई तुझेही लाड करेल. तू चल माझ्याबरोबर. तुझी आई किती प्रेमळ आहे. तुझ किती कौतुक करते!” मैत्रीणीला चिऊच्या आईला भेटायची आस लागली होती. पण चिउला मात्र तिला कसं टाळाव कळेना. आता नको,

पुढच्या वेळी असा चिऊचा गुळमुळीतपणा सुरू झाला. मैत्रीणही इरेला पेटली होती. तिला चुकवून चिऊने पळ काढला. मैत्रीण तिच्या वरताण निघाली. चिऊच्या पाठोपाठ तिला चुकवून तीही निघाली.

दारात पाय की घरात पाय चिऊची आई कडाडली, “भांडी घासायला घे आधी. आली बाजीराविण माहेरचा आहेर घ्यायला. आयतं गिळायला. आधी कमवायला शिका म्हणावं. बाहेर राहून शिकणार आणि आमच्या जिवावर आराम करायला येणार. बापसान लाडवून ठेवलंय.” आई बाहेर येत म्हणाली “आणि हे काय येताना भाजी नाही आणलीस ती? ” कपाळावर आठ्या चढवतच तिने विचारले.

चिऊची भांडी घासून होतात न होतात तेवढ्यात आई म्हणाली, “चिवे काहीतरी खायला कर. म्हणजे आम्हालाही गिळायला मिळेल. कामानं कातावून गेलाय जीव अगदी. इकडे तिकडे करणं पुरे झालं.” चिऊ घरचं इतकं कौतुक करते आणि आपल्याला न्यायला मात्र बघत नाही. दाल मे कुछ काला है जरूर! शेजारच्या घरातून मैत्रीण ते सारं ऐकत आणि बघत होती. ती दिग्मुढ होऊन पहातच राहिली. शेवटी तिच्याच्याने राहवेना आणि ती चिउपुढे आली. चिऊ चकीतच झाली. चिऊच्या आईच्या वागण्याचे तिला मोठे कोडे वाटत होते. कधी एकदा तिला याबद्दल विचारते असे तिला झाले होते.

एसटीत बसता क्षणी तिने चिउला गाठले. आणि विचारलेच. “चिऊ तू घराचे, आईचे जे वर्णन करत होतीस ते सगळं खोटं होतं? माझी आई एवढे लाड

करत नाही याचं मला खूप वाईट वाटायचं. पण तुझ्या घरी गेल्यावर वेगळंच बघायला मिळालं. तुझी आई सावत्र आहे का ग? तुला इतका त्रास का देते?”

चिऊ दिसायला सामान्य होती ही काय तिची चूक होती? चिऊची सख्खी आई. पण तिला सतत दिसण्यावरून बोलत होती. चिऊ सावळी होती. बुटकी होती. शिवाय तिच्या पाठीवर दोघी बहिणीच झाल्या होत्या. तिची पाठ चांगली नाही म्हणून आई तिच्या पाठीत सारखी मारायची. तिच्या गुणांची तर आईला बिलकुल कदर नव्हती. चिऊ कष्ट घेऊन अभ्यास करत होती आणि वर्गात पहिला नंबर काढत होती. त्याचं तिच्या आईला काहीच कौतुक नव्हतं. घरातली काम करून बहीणींनाही सांभाळायला लगायचं तिला. वडीलाना मात्र तिचं कौतुक होतं. पण ते बाहेरगावी असल्यामुळे तिला दोन तीन महिन्यातून एकदाच भेटायचे. आई मात्र तिच्याशी उभा दावा मांडल्यासारखी वागायची.

“मी जर दु:खी, कुढत राहिले तर मला त्रासच होणार. त्यापेक्षा मी खूप आनंदात आहे अशीच नेहमी कल्पना करते त्यामुळे मी खरोखरच तशी सुखात आहे असं मला वाटायला लागतं. आणि मी मस्त आहे असं मी मानलं की अभ्यासातही लक्ष लागतं. खूप अभ्यास करून, शिकून मला कलेक्टर व्हायचंय. त्यासाठी मला थोडा त्रास झाला तरी चालेल. माझ्या अभ्यासात व्यत्यय यायला नको म्हणून मी तशीच स्वप्नं पहाते. परिस्थिति नसताना बाबांनी आईच्या मनाविरुद्ध मला शिक्षण द्यायचं ठरवलं. म्हणून आज बाहेरच्या जगात काय घडतय हे मी बघू शकते. मी आईला काही सांगू शकत नाही. पण जेव्हा मी काहीतरी बनून दाखवेन तेव्हा आई माझं सगळं ऐकायला लागेल. मला तिला काही सांगायचा अधिकार मिळेल. माझ्या

बहिणींना सुद्धा मी शिकवणार आहे. आई जे वागते आहे ते तिच्या कमी शिक्षणामुळे. त्यात तिचा काही दोष नाही. राहता राहीलं माझं दिसणं. ते आपल्या हातात थोडीच असतं? आपलं मन चांगलं असेल तर सगळं जग चांगलं असतं. आईच्या अडाणीपणामुळे ती किती दु:खी असते. म्हणून उद्याच्या आशेवर मी स्वप्न बघत असते. आणि माझा प्रत्येक दिवस चांगला जातो."

चौदा पंधरा वर्षांची चिऊ एका छोट्याशा आशेवर आयुष्याच गणित मांडत होती. स्वप्न आणि सत्य यात महद् अंतर होतं. मैत्रीणीला ते कळायला फार वेळ लागत होता म्हणूनच चिऊच्या स्पष्टीकरणाने मैत्रीणीचा वासलेला आ मात्र बंद व्हायला बराच वेळ लागला होता.

# हुकलेला नेम



उद्या एस एस सी चा रिझल्ट जाहीर होणार होता. गणिताचा पेपर निकेतला खूप अवघड गेला होता. काय करावं काही कळत नव्हतं. त्याच्या सैरभैर मनात काहीबाही विचार येत होते. गणितात नापास झालो तर आईबाबांना बाहेर तोंड दाखवायला जागा रहाणार नाही. पुन्हा परीक्षेच्या किती वाऱ्या कराव्या लागणार कुणास ठाऊक! आपण सगळयांच्या पाठीमागे पडणार. मित्रांकडून छी:थू होणार. खूप मानहानी सहन करावी लागणार. “एवढं पास होता आलं नाही?” अशा शिक्षकांच्या तिरस्कारयुक्त नजरा समोर येणार. आईबाबा आपल्याला खूप बोलताहेत याची स्वप्न पडायची. त्याची धाकटी बहीण पल्लवी त्याच्या रिझल्टची त्याच्यापेक्षा जास्त वाट पहात होती. पुढच्या वर्षी तिची एस एस सी होती. त्याच्या मनाची मात्र घालमेल होत होती. नापासाच्या शिक्क्याची नामुष्की टाळायची कशी, यावर मार्ग काय याचा विचार चालला होता. नाना विचारांनी त्याचं डोक भणभणायला लागलं होतं. असं अपयश पत्करण्यापेक्षा आपण या जगातच राहिलो नाही तर......

हा विचार त्याच्या मनात कली शिरावा तसा शिरला. या विचाराने निकेतच्या चांगल्या विचारांवर कुरघोडी केली. रात्र होईपर्यंत कळ काढावी लागणार होती. सगळीकडे शांततेचे साम्राज्य पसरेपर्यन्त वाट बघायला पाहिजे

होती. तयारी झाली होती. किचनमधला सीलिंग फॅन, लॉफ्टवरचे डबे काढण्यासाठी आई वापरत असलेले स्टूल. शिवाय अत्यंत महत्वाचा दोरखंड! पंख्यापासुन स्टूलपर्यंत दोरखंड किती लागेल याचा अंदाज घेऊन त्याने तो लपवला होता.

पडल्या जागी निकेत सतत चुळबुळ करत होता. सगळीकडे निजानीज झाली. मनाचा हिय्या करून तो उठला. किचनचा दरवाजा हलक्या हाताने ओढून घेऊन कडी लावली. स्टूल उचलून पंख्याखाली ठेवलं. छातीत धडधडत होतं. हाताला घाम सुटला होता. काही सेकंदच आपल्याला गळफासाचा त्रास होईल पण नंतर आपण सगळयाच्या पलीकडे पोहोचणार. कशाचाच त्रास नाही मग! या विचाराने त्याने दोरीचा फास आपल्या गळयात अडकवला. स्टूल ढकलल. दोरखंड गळयाला कचला. आणि.......

काही कळायच्या आतच तो जमिनीवर आपटला. आवाजाने तो स्वत:च दचकला. दोरखंड पंख्यातून निसटला होता. आणि गळयाला फास बसता बसताच तो निघाला होता. क्षणभराने तो भानावर आला. स्टूलच्या आवाजाने आईबाबा जागे झाले असतील का याचा मागोवा तो घ्यायला लागला. सगळीकडे शांतच होतं. पण आता त्याचा धीर सुटला होता. डोळयातून नकळत पाण्याच्या धारा लागल्या होत्या. हुंदक्यावर हुंदके फुटत होते. आणि एवढ्यात किचनच्या दारावर थाप ऐकू आली. अरे दार बंद का? त्याही अवस्थेत गडबडीने त्याने स्टूल उचलून ठेवले आणि दोरी लपवली. बाबा पाणी प्यायला उठले होते. कडी काढल्यावर त्याला आणखीनच भडभडून आले. अंधारात काय एकटाच रडत बसलायस? म्हणून बाबांनी त्याला जवळ घेतलं. पाठीवरून हात फिरवला. अरे रिझल्ट लागणार म्हणून एवढं घाबरून जाऊ नको. जो काय निकाल असेल तो असेल. चांगल्या

मार्कांनी पास झालास तर उत्तमच पण तुला गणिताचा पेपर अवघड गेला म्हणाला होतास. तो पुन्हा देता येईल. एस एस सी ची परीक्षा हेच आयुष्यात अंतिम ध्येय नसतं बाळा. त्यापेक्षा खूप काही महत्वाच असतं. पाहिल्याच परीक्षेला तू रडत बसलास तर पुढच्या परीक्षा कसा देणार? राहता राहिला आमच्या रागावण्याचा प्रश्न. तू काही काळजी करू नकोस. तुला कमी मार्क्स पडले म्हणून आम्ही तुला रागावणार नाही. तू अभ्यासात काही हयगय केली नाहीस. वडिलांच्या आश्वासनाने त्याला भरून यायला लागलं.

रिझल्टचा दिवस उजाडला. निकेत पंचाहत्तर टक्क्यांनी पास झाला होता. गणितात त्याला मार्क्स कमी पडले होते. त्याचे आईबाबा आणि बहीण आनंदित झाले होते. पुढ काय करायचे किंवा कुठल्या कॉलेजला प्रवेश घ्यायचा याची चर्चा जोरात सुरू होती. फोन घणघणत होता. निकेत हसून सगळयांना रिझल्ट सांगत होता. पहिला पेढा देवाला ठेवला, दूसरा वडिलांना भरवताना त्याच्या डोळयासमोर गळफास लावलेला तो आणि धाय मोकलून रडणारे त्याचे आईबाबा आणि बहीण नजरेसमोर आली. खराखुरा रिझल्टही फेर धरू नाचायला लागला. त्याला वाटून गेलं, तो दोर ऐनवेळी निसटला नसता तर............

# बूमरँग

"वर पाहिजे-विनापत्य, विधुर, घटस्फोटीत चालेल, जातीची अट नाही, वय 40ते 45, स्वत:च्या मालकीचे घर असलेला, मासिक प्राप्ती लाखाच्या घरात. वधू- 37, देखणी, सुसंस्कारित असल्याने कोणत्याही जातीत सहजगत्या मिसळून जाणारी. मोबाइल नं.XXXXXXXXXX "

जाहिरात दिल्यानंतर चारच दिवसात सुधांशु बरोबर शीतलची भेट झाली. सुधांशुची पत्नी लग्नानंतर सहा वर्षांनी अल्पशा आजाराने गेली. त्याची महिन्याची मिळकतही समाधानकारक असल्यानं शीतलने या प्रस्तावाला मान्यता दिली. फक्त त्याचं राहत घर मात्र स्वत:चं नव्हतं. आठवडाभरात त्यांचं शुभ मंगल झालं. लग्नाला शीतलची एक मैत्रीण आणि सुधांशुचे दोन मित्र उपस्थित होते. हनिमूनला दोघे काश्मीरला गेले. सुधांशु बराच हौशी दिसत होता. खर्चिक तर खूपच होता. शितलला तर त्याने कुठे ठेवू आणि कुठे नको असे केले होते.

काही महीने किंवा एखाद दुसरे वर्ष त्याच्याबरोबर काढून त्याच्या संपत्तीत वारसाहक्क सांगून त्याला घटस्फोट देण्याचा आणि त्याच्याकडून पोटगी वसूल करण्याचा सुरूवातीला शितलचा इरादा होता. गेल्या दोन वेळा आयुष्यात आलेल्या पुरुषांशी तिने केलेले नाटक अप्रतिम वठले होते. दोघांची जमापुंजी, आपल्या नावावर करण्यात ती यशस्वी झाली होती. त्या दोघांना तिने चांगले नामोहरम केले होते.

पण यावेळी मात्र स्वत:च्या कुटुंबाचा आगापिछा नसलेल्या शितलला सुधांशु हाच एकमेव आधार वाटायला लागला. आता तिसऱ्यावेळी सुधांशूला

हुलकावणी देताना तिला आपली दमछाक झाल्यासारखे वाटले. आणि झालंही भलतच. शीतल त्याच्यात मनापासून गुंतत चालली होती. सहा सात महिन्यांनी तर तिला आपलं मूल हव असं वाटायला लागलं. अगदी स्वत:च्या हाडामांसाचं. आपल्याच शरीराचा हिस्सा असणारा नवीन जीव आपण निर्माण करायला हवा असा तिला ध्यास लागला. सुधांशुची संपत्ती घेऊन आपण एकटीनेच आयुष्य काढण्यापेक्षा, नाहीतरी त्यालाही आपले प्रेम लागले आहे तेव्हा त्याला फसवण्यापेक्षा आहे तोच संसार आनंदाने पुढे न्यावा अशा उदात्त हेतूने ती निर्धास्त झोपी गेली. सकाळी उठल्यावर आपण मुलाचा विषय काढायचा हे तिने मनाशी ठरवले होते.

सकाळी डोळे किलकिले करत तिने सुधांशूला चहाचे फर्मान सोडले. उत्तर नाही. बराच वेळ ती तशीच पडून राहिली. पण घरात काहीच हालचाल दिसेना. असं आपल्याला न उठवता, न सांगता कुठे जात नाही म्हणून तिने त्याच्या मोबाइलवर फोन लावला तर तो पहुंच के बाहर! चहा आपणच करून घ्यावा म्हणून ती ओट्याशी आली तर त्यावर चिठ्ठी होते. "माझा शोध घेऊ नको. विनाकारण पोलिसांच्या जाळयात सापडशील ---सुधांशु." ती कोड्यात पडली. साधा सरळ सुधांशु, आपल्याला असं एकटं सोडून जाणार नाही अशी तिची खात्री होती. हळूहळू एकेक गोष्टी तिच्या लक्षात येत गेल्या. तिच्या विश्वासाचा फायदा घेऊन सुधांशुने तिचा सगळा बँक बॅलेन्स साफ केला होता. तिच्या दागिन्यांचा लॉकरही साफ झाला होता. तिचे होते नव्हते ते सगळे शून्य झाले होते. तिने जी खेळी खेळायची ठरवली होती, ती तिच्यावरच उलटली होती.

# घरोंदा

आकाशात ढग दाटून आले होते आणि मुग्धाच्याही मनात विचारांची अशीच गर्दी दाटली होती. आई वडिलांनी स्वत;चे निर्णय स्वत: घेण्याचे स्वातंत्र्य तिला लहानपणापासून दिले होते. त्यामुळे कुठलाही निर्णय घेताना ती डगमगली नव्हती. पण जेव्हा कैलास बरोबर लिव्ह इन रहाण्याचा तिचा मनोदय तिने घरात बोलून दाखवला तेव्हा आईवडिलांनी त्याला थोडी नापसंती दाखवली होते. आपले संस्कार आपल्याला सहजासहजी असं संसारात राहून संसार न केल्यासारखे होऊ देणार नाहीत असं त्यांचं मत होतं. आणि जर दोघांची मत जुळत नसतील तर घटस्फोटाचा पर्याय आहेच, याउप्पर तुझी मर्जी म्हणून तिला कैलासकडे रहायला जायची परवानगी मोठ्या मनाने त्यांनी दिली होती.

ती आणि कैलास एकाच जाहिरात संस्थेत काम करत होते. कैलास ग्राफिक डिझायनर म्हणून आणि ती क्लाएंट सर्विसिंग एक्झीक्युटीव्ह म्हणून. दोघेही लिव्ह इन म्हणून जवळजवळ चार वर्ष एकत्र रहात होते. एकत्र काम करताना दोघांच्या कामाचे स्वरूप, ताण एकमेकाना माहित होते. मुग्धा स्त्रीमुक्तीच्या, लिव्ह इनच्या कल्पनेने भारलेली होती. तर कैलासला लग्न करणेच ठीक वाटत होते. पण तरी मुग्धाला जस हव तसं करायला त्याची ना नव्हती. दोघांच्या आवडी निवडी खूपशा सारख्या होत्या. आपलं जमेल या इराद्याने दोघांनी प्रथम लिव्ह इन म्हणून रहायचे असा विचार केला आणि जर पटलच तर पुढे लग्न करायचं ठरवलं होतं.

तिचे आणि कैलासचे व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलचे विचार खुपसे सारखे होते. त्यामुळे घरातलं काम कोणी करायचं यावर त्यांचा कधी वाद व्हायचा नाही. तिने कपडे आवरले तर तो भांडी लावायचा. त्याने खायला केलं तर ती घरातला बाकीचा पसारा आवरायची. पण कैलासचा बेशिस्तपणा मात्र तिला खूप त्रास द्यायचा. घरी आल्यावर कपडे, शूज, मोजे, मोबाईल, ऑफिसची बॅग या वस्तू इकडे तिकडे विखरून पडायच्या. मी काही तुझी बायको नाही, मैत्रीण आहे म्हणून ती प्रथम तिकडे कानाडोळा करायची. पण शिस्तप्रिय मुग्धाला ते रुचायचं नाही. दुसरं तिला आवडायचं नाही ते म्हणजे त्याचा possessiveness. आपण जर दोन स्वतंत्र व्यक्ती म्हणून वावरतो आहोत तर माझ्यावर अधिकार गाजवायचा तुला काही हक्क नाही, असं मुग्धाचं म्हणणं. नकळत कैलासचं नवऱ्यामध्ये रुपांतर व्हायला लागलंय असं मुग्धाला वाटायला लागल होतं. दोघांचं सोशल सर्कल मोठं होतं. पण त्यातही मुग्धा थोडीशी अलूफ असायची. स्त्रीमुक्तीचे भन्नाट विचार असलेल्या मुग्धाला खाजगी बाबतीत कैलासचा हस्तक्षेप आवडायचा नाही. आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येतेय असं वाटल्यामुळे तिला त्याच्या वागण्याचा काच वाटायला लागला होता. आणि एक दिवस तिच्यालेखी सो कॉल्ड तकलुपी असलेल्या या नात्याचा तिने शेवट केला.

आज अशाच पावसाळी संध्याकाळी ती एकटीच बाल्कनीत बसली होती. तिला पूर्वीची एक चिंब पावसाळी सायंकाळ आठवली. ऑफिसमधून परतताना कैलासने भजी आणि वडे आणले होते. तिला फोन केला. क्लाएंटकडून घरी येऊन तिने कपडे बदलून होईपर्यंत त्याने चहा तयार ठेवला. त्याने गाणी चालू केली. “रिमझिम गिरे सावन...., रिमझिम के तराने लेके आई बरसात......दोघही ओल्या हवेचा उबदार आनंद मनमुराद लुटत होती.

ती विचार करायला लागली. एक ज्वेलरीचा क्लाएंट होता. कैलासने अक्षरश: दिवसभर खपून अतिशय सुंदर जाहिरात तयार केली होती. पण ती

क्लाएंटला पसंत पडली नाही. त्यावर बॉसचा शेरा होताच. त्यानंतर सात ते आठ डिझाइन्स त्याने दाखवली होती. शेवटी एक जाहिरात फायनल झाली आणि शेवटच्या क्षणी ज्वेलरच्या बायकोने नाक मुरडले. शी! काय हे डिझाईन! त्याच्या सगळ्या करणीवर पाणी पडल. कैलास भावनाप्रधान होता. तो खूपच फ्रस्ट्रेट झाला. त्याला निराश मूडमधून मुग्धानंच तर बाहेर काढलं होतं. अरे शेवटी आपल्या क्रिएटीव्हिटीपेक्षा ग्राहकाची मर्जी, आवड महत्वाची. आपल्याला अँडजस्ट करायलाच पाहिजे. असं नाउमेद होऊन चालणार नाही. किती आणि काय समजूत घातली होती. तेव्हा कुठे नव्या दमाने त्याने रात्रभर जागून आणखी डिझाईन तयार केले आणि ते फायनल झाले. अँडजस्ट करायला तर आपणच कैलासला सांगत होतो. क्लाएंट सर्विसिंगलाही तिला ग्राहकाला कितीतरी पटवून सांगायला लागायचे. याबाबतीत कधी आपलं पारडं कमी पडणे, कधी यशस्वीरीत्या पटवणे हे अनुभव तिला काही नवीन नव्हते. शेवटी बाहेरच्या जगाशीही तडजोड करायलाच लागत होती.

स्त्रीमुक्ती, स्त्रीस्वातंत्र्य आणि कैलासची वाटणारी ओढ याचा सारासार विचार मुग्धा करत होती. विचार करकरून तिच डोकं भणाणून गेलं. तडजोड करून आपलं घरकुल सावरायचं कि आपलं व्यक्तिस्वातंत्र्य जपायचं याचा विचार ती करत राहिली. इमोशनली तिच्यावर अवलंबून असणाऱ्या कैलासला हलकेच दूर सारायचं कि त्याच्यात गुंतलेल्या आपल्या मनाला तडजोड करायला लावायची? सहवासान निर्माण झालेली ओढ महत्वाची कि पुढे होणारा संघर्ष आताच टाळायचा या द्वंद्वात ती सापडली होती. आणि त्यांचं घरट तिच्या विचारांच्या वाऱ्याने हेलकावे खात होतं.

# जीवनदाता



बायोप्सीचा रिपोर्ट आला आणि मधुची दुनिया दुभंगून गेली. छोट्या गावात त्याच्यावर इलाज होण शक्यच नव्हतं. मुंबईला त्याचं ना कोणी नातेवाईक ना कोणी ओळखीचं. पण जायला तर पाहिजेच होतं. बायको आणि मुलीला घेऊन तो निघाला. सगळीच मदार त्याच्यावर होती. बायकोलाही काही माहिती नव्हती. आणि मुलगी तर दहा वर्षांची. मधु प्राथमिक शिक्षक होता. त्याच्या वाचनाचा आवाका मोठा होता. ज्ञान आणि माहितीच्या आधारावर बऱ्याच अंशी तो सावरला होता. पण शेवटी संसाराची जबाबदारी चालवायची तर त्यालाच होती. आपल्यानंतर काय? हा मोठा प्रश्न त्याच्यापुढे आ वासून उभा होता. मुलीला हाताशी यायला खूपच अवधी होता. आईवडिलांची जबाबदारीही होती.

हॉस्पिटल मध्ये बरीच मोठी रांग होती. डॉक्टर बोर्जेस त्याच्यावर इलाज करणार होते. तो डॉक्टरना भेटला आणि आश्वस्त झाला. “अरे कुणाचं आयुष्य किती हे कुणाला माहिती आहे? तू लगेच यातून बाहेर पडशील आणि कदाचित मीच रहाणार नाही या जगात” डॉक्टर हसत हसत म्हणाले होते. डॉक्टर बोर्जेस नसते तर आज मी एवढं सुंदर जग पाहू शकलो असतो का? त्याला नेहमी वाटायचं, डॉक्टरांच्या रूपाने आपल्याला देव भेटला.

पहिल्या भेटीतच त्यांनी मन जिंकून घेतलं होतं. प्रसन्न व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉक्टरना पाहताच पेशंटच्या मनाला उभारी येत असे. डॉक्टर बोर्जेस रूग्णाला खूप छान कौन्सेलिंग देत. रुग्ण आपला आजार विसरून जात असे. मधुला तपासताना त्याची रहाण्याची नसलेली सोय, पैशाची कमतरता त्यांना जाणवली



होती. पण तरीही हा माणूस स्वत:मधल स्वत्व, स्वाभिमान जपणारा आहे हे त्यांनी ओळखलं होतं. त्याला आपल्या ओळखीतून राहण्याची आणि जेवणाची स्वस्तात व्यवस्था केली होती.

बघता बघता तो त्या असाध्य आजारातून बाहेर पडला होता. सुरूवातीला हॉस्पिटलची पायरी चढताना छातीत होणारी धडधड थांबली होती. त्याची जागा आता डॉक्टरांच्या भेटीच्या ओढीने घेतली होती. मधुला त्यांच्याशी गप्पा मारायला खूप आवडायचं. ते शारीरिक आणि मानसिकही ट्रीटमेंट देत होते. त्याच्या वाचनाच्या व्यासंगाने डॉक्टरांनाही त्याची भेट हवीहवीशी वाटायची. त्याचे ऑपरेशन झाले. सहा केमो झाल्या. फॉलोअपसाठी आता वर्षातून एकदाच यायला डॉक्टरनी सांगितले. वर्ष कधी संपले ते कळलंच नव्हतं. गावाकडचे पेढे घेऊन मधु मुंबईला निघाला. आपल्याजवळ डॉक्टरना देण्यासारखं काही नाही हे त्याला माहीत होतं. तरी त्याने डॉक्टरना आवडतील अशी चार इंग्रजी पुस्तक विकत घेतली, मुंबईतच.

रिसेप्शन काउंटरला आल्यावर मोठ्या आत्मविश्वासाने त्याने विचारले, "डॉक्टर बोर्जेस? त्यांना भेटायला आलोय." गमावलेली आपली तब्बेत पुन्हा पूर्ववत

झालेली पाहताच त्यांना आनंद होईल ही त्याची अपेक्षा. काउंटरवरची मुलगी त्याच्याकडे पाहतच राहिली. “काय काम होतं?”



“ त्यांनी माझ्या आयुष्याला उभारी दिली. मृत्युच्या दाढेतून मी त्यांच्यामुळे सुखरूप बाहेर पडलो. त्यांना धन्यवाद द्यायला आलोय.” त्याला परिस्थितीची कल्पना नाही हे तिच्या लक्षात आलं.

“तुम्हाला माहीत नाही? डॉक्टर बोर्जेस एक महिन्यापूर्वी गेले.”

“म्हणजे..........? कशाने?”

“कॅन्सर. लास्ट स्टेज होती. कॅन्सरवर इलाज करणारे, पण त्यांच्याच लक्षात आलं नाही आपल्याला कॅन्सर झालाय ते!”

मधू दिग्मुढ होऊन पहातच राहिला.

# गीत अधुरे राहिले.........



समुद्रात अगदी आतमध्ये असणाऱ्या खडकावर त्याला बसायला खूप आवडायचं. संध्याकाळी क्षितिजावर पसरलेला लालिमा पहात, तिचा हात हातात घेऊन तिला कविता ऐकवायचा त्याला बऱ्याचवेळा मूड यायचा. आज ती त्याला आवडणारी साडी नेसली होती. मावळत्या सूर्याच्या साक्षीन समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकत त्या खडकावर बसली होती. जे घडलं ते सत्य आहे यावर तिचा विश्वास बसत नव्हता. वाऱ्याच्या आणि लाटांच्या रोरावणाऱ्या आवाजात तिच्या आठवणींच्या लडी तिच्याही नकळत अलगदपणे सुटायला लागल्या.

“ कोनफळी रंग तुला शोभून दिसतो. आज तू तीच साडी नेस.”

“ शी, मला नाही आवडत तो रंग. त्यापेक्षा माझ्या आवडीचा मी मेहंदी कलरच नेसिन.”

“ तुझे रूप राणी कुणासारखे गं, तुझे रूप राणी तुझ्यासारखे!”

“किती पोरकटपणा हा.......”

“केसात माळले गं सुरंगीचे गजरे, मात्र नजर तुझ्या कचभारावरती खिळे. माझ्यातली प्रतिभा तर तूच आहेस !”

“आचरटपणा पुरे झाला तुझा. मला खूप कामं पडली आहेत. काही काळवेळ आहे की नाही तुला? तुझ्यासारखा चळ लागला नाही मला.”

“रातराणीचा सुवास जरा उत्फुल्ल मनाने श्वासात भरून घे आणि बघ चमत्कार त्या मदमस्त गंधाचा.”

“इथे भाजी आणि आमटीला फोडणी देताना कसला आलाय रातराणीचा गंध?”

“सकाळी भैरवचे सुर ऐकलेस? जाग जाग यदुनंदन प्यारे. दरस लागी तुमरे सब हारे.”

“हे बघ आता मला डबा करायचा आहे. नाश्त्याची वेळ झाली की तू येणार ना खायला? तुझ्यासारखी नुसती गाणी आणि कविता करून पोट भरणार आहे का?”

“अगं काय मस्त आयुष्य आहे आपलं. तू मात्र कामानं पिचलेली असतेस! मान वर करून बघ राणी जग आहे किती सुंदर. संसाराची सुरुवात अजून झाली नाही आणि तू या रामरगाडयात फसलीस?”



*************

" मधुवंतीच्या सुरावटीवर कोकिळ कुहू कुहू बोले, सजणी गं तुजसंग प्रीत मधुर डोले."

“आता पुरे झालं तुझ्र प्रीत आणि प्रेम. संसारात काय फक्त प्रेम करून चालत नाही.”

“ माझ्यासारखी स्वप्न पहात राहिली नाहीस तरी निदान वास्तवाच्या चटक्यांनी पोळून तरी जाऊ नको.”

“ पण जगायला तर वास्तवातच हव ना!”

“चल या विकेंडला आपण देवबागला जाऊ. समुद्राची गाज ऐकत छान किनाऱ्यावरून फिरू. पुन्हा एकदा नवथर होऊन लाटा पायांवर घेऊ आणि पायाखालची वाळू सरकताना दोघ एकमेकांना सावरू.”

“छे छे, या शनिवारी तर मला रजा घ्यायलाच जमणार नाही. उलट वर्कलोड जास्त आहे. मला ऑफिसमधून यायला कदाचित उशीरच होईल. कामाचं टेंशन असताना मला बाहेर फिरण्याचा विचारही करवत नाही”

“काम को मारो गोली. आयुष्यात सौंदर्याचा आस्वाद घ्यायला शीक गं. कधीतरी स्वत;साठी, माझ्यासाठी वेळ काढ. इच्छा तिथे मार्ग असं कुणीस म्हटलय ना! ”

“ कामवालीसुद्धा बहुतेक सुट्टी घेणार म्हणत होती. मग घरातल्या कामाचाही ढीग उपसावा लागणार आहे."

“कामं काय करशील गं, पण आजचा क्षण जगण्याचा, उद्या पुन्हा येणार नाही.”

**********

“तू येणारच नाहीस?”

" सदा उठून तुझ्यामागे फिरायला मी रिकामी नाही. की तुझ्यासारखी मनस्वी कलाकारही नाही. मी आहे वास्तवाचे भान ठेवून जगणारी स्त्री."

न मागता मिळालेली प्रीत तिच्या ओंजळीतून निसटून गेली होती. त्याच्या मनात उमटणारी चित्रं तिला दिसलीच नाहीत, कलासक्त कलाकाराचा आत्मा मात्र तळमळत राहिला. त्याचवेळी थोडंसं समजून तिने घेतलं असतं तर.......... ते काम जेनीने केलं होतं. जेनी त्याच्याशी तद्रूप, तन्मय होऊन गेली होती. त्याला हवा असलेला हुंकार फक्त जेनीच देऊ शकत होती. तिच्याशी त्याने केलेली प्रतारणा कदाचित सागराला मंजूर नव्हती. त्याचं, जेनीच एकरूप होणंही! जे सुख तिला मिळालं नाही ते जेनीलाही मिळू नये हा बहुधा निसर्गाचा न्याय होता. म्हणूनच त्या विशाल रत्नाकरान दोघांना स्वत:मधे सामावून घेतलं होतं.

आठवणीत गुंतलेली ती खडकावर नुसतीच बसून राहिली समुद्राची गाज ऐकत. आज तिला आर्जव करणारा तो तिच्याजवळ नव्हता. तिला विनवून सौंदर्याचा आस्वाद घ्यायला लावणारा रसिक तिच्या समीप नव्हता. ना भैरवचे स्वर कानावर येत होते ना मधुवंतीचा कोकिळ साद घालत होता. आज त्या गाजेत ना जीवन रसरसून उपभोगण्याची ऊर्जा होती ना आनंदाने वेड होण्याचा उन्माद. तिच्या कानी पडत होता लाटेचा निव्वळ भयाण आवाज.

# हिशोब



दोघांचही ठरलं होतं की लग्नाच्या पंचविशीच्या निमित्ताने दोघांमध्ये जर काही सिक्रेट्स असतील तर ती एकमेकांना सांगायची. तसं म्हणायला गेलं तर दोघांमध्ये बऱ्यापैकी सुसंवाद होता. सर्वसामान्य नवरा बायकोमद्धे होतात तसे होणारे किरकोळ वाद सोडल्यास कुठल्याच बाबतीत आडपडदा नव्हता. म्हणूनच दोघांनीही एकमताने ठरवलं होतं की आतापर्यंतचा जीवनातला आपापला पट उलगडून दुसऱ्याला दाखवायचा. सुरुवात कुणी करायची, यावर ठरलं त्याने करावी. आपल्या शाळा कॉलेजमधल्या गमती जमती सांगता सांगता त्याने सहजच आपल्या असफल ठरलेल्या प्रेमाची पण त्याला आवडणाऱ्या एका मुलीची कहाणी तिला ऐकवली. तीही उत्सुकतेने ऐकत होती. लग्नानंतर काही महीने त्याला कधीतरी येणाऱ्या निनावी फोनचे रहस्य आता तिला उलगडले होते. पण तो म्हणतोय त्याप्रमाणे त्याचं त्यानंतर कुठलही अफेयर नव्हतं.

तिनेही कबुल केलं की तिच्यावर एकजण एकतर्फी प्रेम करत होता. तिच्या आई वडिलांना ते मान्य नव्हतं. आणि तीसुद्धा त्याला जोडीदाराच्या भूमिकेत स्वीकारू शकत नव्हती. ती एकदा कॉलेजच्या ट्रीपला गेली होती आणि तोल जाऊन ती पाण्यात पडली. तिला पोहता तर येत नव्हतं. बाजूला उभ्या

असलेल्या त्या व्यक्तीने तिला वाचवलं. तिच्यावर प्रेम करणाऱ्या त्या प्रेमिकाला बरेच दिवस प्रेमभंगाचं दु:ख जाळत होतं असं तिच्या मैत्रिणीकडून ऐकिवात होतं. पण त्याने तिच्यावर कुठलाही सूड उगवला नव्हता. किंवा तिच्यापाठीही तो पडला नव्हता. तो आपल्या मार्गाने गेला होता.

त्या दोघांच्या लग्नाच्या पंचविशीचा घाट तिने घातला होता. हॉटेलमध्ये संगीताचा कार्यक्रम आणि त्यानंतर छान जेवण असा बेत होता. आखलेला कार्यक्रम छान पार पडला. लग्नाच्या पंचविशीला आलेली मंडळी एक एक करून पांगत होती. हॉल जवळजवळ रिकामा झाला होता. इतक्यात दोघीजणी स्त्रिया आत आल्या. सुस्थितीतल्या वाटत होत्या. दोघी मायलेकी असाव्यात असे वाटत होते. त्या तिला भेटल्या पण त्या दोघीना त्याला भेटायचं होतं. कुठून आल्या, काय पाहिजे, ते सांगायला तयार नव्हत्या. तो आला आणि आश्चर्याने थबकला. संभ्रमित अवस्थेत त्याला काय करावं ते सुचेना. दोघीतली वयाने मोठी त्याचे आर्जव करताना दिसत होती. तरुण मुलगी बावचळलेल्या अवस्थेत उभी होती. तर त्याच्या चेहऱ्यावर, आता पुढे काय? हे मोठे प्रश्न चिन्ह होते. ती पुढे सरसावली. त्याला घेऊन बाजूला झाली. काय झालंय याची चौकशी केली. मग थोड्याच वेळात ती आत्मविश्वासाने पुढे झाली. तरुण मुलीला आपल्या कवेत घेतले. आणि प्रौढ स्त्रीला आश्वासक नजरेने आणि स्पर्शाने शांत केले.

प्रौढ स्त्री ही त्याची एके काळची प्रेमिका होती. त्याला लग्नाला नकार देऊन ती ज्याच्या प्रेमात पडली तो फक्त थोडक्याच दिवसांची सोबत तिला देऊ शकला. तिची ही मुलगी लहान असताना तो अचानक गायब झाला. एकटीने मात्या पित्याचा दोघांचाही रोल निभावला. पण आता मुलीला स्थळ पाहताना वडिलांच्या

हयातीचा प्रश्न आडवा येत होता. वर्तमानपत्रात आलेल्या त्या दोघांच्या विवाहाच्या रौप्य महोत्सवी शुभेच्छावरुन त्याचा शोध घेणे सहज शक्य झालं होतं. ज्या स्वभावासाठी त्याला डावललं होतं तो साधा सरळ मार्गी स्वभाव आता खूप महत्वाचा वाटत होता. त्याच्या आयुष्यातला मौलिक क्षण असताना सहजासहजी तो आपल्याला नाही म्हणणार नाही, कदाचित या खात्रीनेच कन्यादानासाठी तिने विनापत्य असलेल्या त्याला विनवण्या केल्या होत्या. पण त्याला प्रश्न पडला होता पत्नीला कोणत्या शब्दात सांगावे? नुकताच तिला दिलेला कबुलीजबाब त्याच्यापुढे वास्तव म्हणून उभा ठाकला होता. पत्नी चतुर होती. म्हणूनच तिने सामंजस्याने मुलीला आपल्या पंखाखाली घ्यायचे ठरवले. दैवाने या दोघांना, मुलांचे संगोपन करण्याचे कष्ट न घेताच रेडिमेड पालकत्व दिले होते. एकदमच मोठी मुलगी पदरात घातली होती. सकारात्मक विचार करणाऱ्या तिने ही गोष्टही फार समजुतीने घेतली होती. एक दिवस तिला मुलीच्या बापाचे नाव कळले. अरे हा तर तिच्यावर प्रेम करणारा तिला जीवनदान देणारा! तरी नाव काय एकसारखे असू शकते म्हणून ती गप्प बसली. लग्नाच्या दिवशी मुलीने आपला बालपणीचा फोटो तिला दाखवला. आणि ती या योगायोगाने चक्रावून गेली. फोटोत मुलगी ज्याच्या कडेवर होती, तो तिला मागणी घालणारा, तिचा जीवनदाताच होता. एकदा दिलेला नकाराचा हिशोब मुलीला बापाचे नाव देऊन, कन्यादान करून पूर्ण केला होता, त्याने आणि तिनेही. आणि त्या दोघांनी परस्परांकडे मांडलेला अलिखित हिशोबही चोख निघाला होता.

# नीयत

मोठ्या हौसेनं आणि आवडीनं हिचं नाव चन्दन ठेवलं. चांगलं शिक्षण घ्यावं. आपला संसार मांडावा असं वाटायचं. मी जरी या खातेऱ्यात पडले असले तरी माझ्या लेकीला अशी घाणेरडी आणि गलिच्छ दुनिया बघायला लागू नये असं मला मनापासून वाटायचं. जेव्हापासून हिच्यावेळी दिवस राहिले तेव्हाच ठरवलं जे मूल होईल त्याला या वस्तीपासून दूर ठेवायचं. त्याच्यावर मला कुसंस्कार होऊ द्यायचे नव्हते. येणारं कुठलं वाट्टेल ते गिर्हाइक घ्यायचं नाही. जरा बरी व्यक्ति असली तरच पुढं सरकायचं. यासाठी किंमत तर द्यावी लागतच होती. गिर्हाइक नाही मिळालं की दोन दोन दिवस उपास घडायचा. पोटातलं बाळ भुकेनं कासावीस व्हायचं. आणि पोटाला तर पाण्याशिवाय आधार नसायचा. कधीतरी गुलाबला माझी दया यायची आणि ती बिचारी एखादी चपाती आणि चहा खाऊ घालायची.

उस्मानभाईला माझा धंदा झाला का नाही याच्याशी काही देणं घेणं नव्हतं. त्याला त्याचा हप्ता मिळाल्याशी मतलब. चन्दनला लहान असताना माझ्या बाजेखालीच झोपवायची. गिर्हाइक जनावर झालेलं असायचं. अशावेळी भुकेनं कधीतरी मधेच ती रडायची कधी तापान फणफणलेली असायची. पोटात गलबलून यायचं. निष्पाप बाळाच्या नशिबात असलं कसलं जिणं? चन्दन पाच सहा वर्षांची झाली आणि कस्तुरी, गुलाबची मुलगी रात्री तिला सांभाळायला लागली. एका समाजसुधारक बाईनं रात्रशाळा चालू केली, चन्दन शिकली आठवीपर्यंत. आणि मला वाटलं चन्दनचं नशीब तिला साथ द्यायला लागलंय. गल्लीतल्या टवाळखोरांच्या फेऱ्या चालू झाल्या होत्या. एक दिवस मला तापान घेरलं, औषधासाठी डॉक्टरकड पाठवलं तिला. बराच वेळ तिचा पत्ताच नव्हता. आल्यावर

बघितलं तर ही नटून थटून गेलेली. डोळयात काजळ, ओठावर लिपस्टिक, भडक रंगाचा कुडता! तिला चांगली फोडून काढायची उर्मी आली होते. पण मी आडवी. तिची लक्षणं माझ्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. आता हिला कुठेतरी लांब हॉस्टेलवर ठेवणं गरजेचं वाटायला लागलं. पण पैशाकडन माझी बाजू लंगडी होती.



आमच्या बोळकांडीतल्या वस्तीत चंदनला सुरक्षित ठेवण अवघड वाटायला लागलं. धरमसी दुकानदाराकडून तो म्हणेल त्या दराला कर्ज घेतलं. आणि तिची रवानगी हॉस्टलवर केली. दहावी पास झाल्यावर तिला कॉलेजात घातलं. पोरगी पुढ शिकेल आणि माझ्या आणि तिच्यापण आयुष्याच भल होईल असं वाटलं. एक वर्ष झालं आणि नालायक पोरगी कुणाचा तरी हात धरून पळून गेली. महिन्याभराने पत्र आलं. मी लग्न करून संसार थाटलाय म्हणून. त्यातसुद्धा मी समाधान मानलं.

चार महिन्यापूर्वी परत माझ्याकड आली. पोटूशी आहे. तिच्याशी लग्न केलेला तिला विकून पळून गेला. चंदननं कशीबशी आपली सुटका करून घेतली आणि पळाली. आता म्हणतेय पोर पाडायचं. माझ्यासमोर प्रश्न आहे पोराला जन्म देऊन याच दुनियेत तिला सामावून घ्यायचं का जीवाचा आटापिटा करू पुन्हा तिला मार्गावर आणायचं! मी अशीच छान छोकीची आवड होती म्हणून घरातून पळून आले. लग्न केलं. पण सगळी दुनिया फसवी होती. मला कळलं नाही. पश्चात्ताप झाला पण काहीच उपयोग नव्हता. माझा परतीचा रस्ता बंद झाला होता. तिच्या कितीतरी मिनत्या केल्या पण सुधरायचं नाव नाही. मी एकदा केलेली चूक आयुष्यभर भोगतेय. चंदनला ही होरपळ सहन करावी लागू नये म्हणून धडपडतेय. पण वळचणीचं पाणी वळचणीलाच जाणार काय?

# येरे येरे पावसा



गण्याच्या बानं जीव दिला असं गण्या बोलत होता. ”पाऊस न्हाई. खायाचं काय? म्हुनशान सोताचा जीव सोडीवला त्येन.” सुनीच्या डोळयापुढं आलं उद्या आपला पण बा जीव देईल. काय करायचं काई सुदरत न्हवत. दोन दिवस झाले. गण्याच्या बाचे दिवस करायला पण पैसे नव्हते.

सुनीने ठरवले, आपण काही झाले तरी बाला जीव द्यायला लावायचा नाही. तिला आईबाचे कोरडेठाक डोळे दिसत होते. रात्री कोरभर भाकरी नि तिखट खाऊन झोपताना ती मनाशी सारखं म्हणत होती, येरे येरे पावसा, तुला देते पैसा. गेल्या वर्षी शाळेत शिकवलेली कविता तिला आठवत होती. तिला शाळा खूप आवडायची.

गण्याच्या आईबरोबर आपणही मजुरीला जायचं तिन ठरवलं. उद्या सकाळी उठल्यावर आधी आयेला सांगायचं ठरवलं. “मी पैस मिळवून आणीन. तुमी

काळजी करू नगासा.” आणि आईच्या कुशीत शांतपणे झोपली. स्वप्नात तिला शाळेतली बडबडगीत आठवत होती. तिन झोपेतही मनाची समजूत घातली. पाऊस पडायला लागल्यावर आईबा शेतात जाणारच. मग आपल्याला काम करायला लागणार नाही. मग आपण शाळेत जाऊ. समाधानान झोपेतच ती हसली.

सकाळी जाग आली तर आईबा शेजारी नव्हती. तिच्या काळजाचा ठोका चुकला. ती बाहेर आली. घराच्या छपरावर धुवाधार पाऊस कोसळत होता. वळचणीला आईबा उभे होते. त्यांच्या डोळ्यातल्या धारा आणि पावसाच्या धारा एकजीव झाल्या होत्या. सुनी मनापासून हसली. तिचा बा आता तिला सोडून जाणार कुठेही जाणार नव्हता.

# रिश्ता

हमने देखी है उन आँखों की महकती खुशबू

हाथ से छू के इसे रिश्तों का इल्ज़ाम न दो

आसमंतातून अगदी दूरवरून गाण्याचे अस्पष्ट स्वर ऐकू आले आणि भूतकाळाच्या आठवणींनी मनाचा कप्पा उलगडला. मनाची आजही उलघाल होतीय. काय म्हणावं या वेड्या मनाला! तो गेलाय माझ्या जीवनातून दूर दूर. पण या गाण्याच्या आठवणीनं मन व्याकुळ होऊन जातंय. बाहेर संततधार बरसणारा पाउस त्याच्या मधुगंध स्मृती पुन्हा पुन्हा ताज्या करतोय.

अशाच एका कातरवेळी झिरमिर बरसणाऱ्या पावसात त्याची माझी भेट झाली. ना ओळख ना पाळख. पण प्रथमदर्शनीच तो अगदी निरागस, मनापासून हसला आणि वाटलं अरे हे तर जन्मजन्मांतराचे मैत्र! त्यालाही माझ्यासारखीच आवडायची सोनचाफ्याची कांचनवर्णी फुलं आणि मलाही त्याच्यासारखाच आवडायचा रातराणीचा धुंद करणारा गंध. खळाळत्या पाण्याचा अनवट नाद आणि नदीचा स्वच्छ तळ दोघानाही तेवढच वेड लावायचा. माझ्या प्रत्येक यशाचा तो साक्षीदार होता. किंबहुना माझ्यातलं मीपण बाहेर यायला तोच तर कारणीभूत होता. निराश मन:स्थितीचा तोच एक आधार होता. त्यावेळी तो ऐकवायचा श्रीरंगाचं अलगुज. क्षणार्धात माझा मूड बदलून जायचा. जगातलं सगळ तत्वज्ञान हाच कोळून प्यायलाय इतका माणसाविषयीचा अभ्यास. भेटला नाही कि मनाला हुरहूर लागायची. समस्त स्त्रियांचे आणि पुरुषांचेही प्रश्न काय असतात आणि असू शकतात यावरही आमच्या चर्चा चालायच्या. तो सगळ काही होता माझ्यासाठी. पिता, गुरु, बंधू, आई, बहिण आणि मित्र. किती नाती आणि शक्ती एकवटल्या होत्या त्याच्या ठिकाणी! मित्रत्वाच्या नात्याच्याही पलीकडच नातं होतं ते! त्याला

माझ्या जीवनातून वजा केलं तर वाटायचं कि माझं आयुष्य शून्य होऊन जाईल. पण नाही झालं तसं.

एक दिवस मला आयुष्याचा जोडीदार गवसला. वाटलं तो आता आपल्यापासून दूर जाईल. पण खरंच नाही झालं तसं. तो नोकरीसाठी परदेशात गेला. तिथूनही त्याचे माझे संभाषण सुरूच राहिले. त्याचं माझं नातं नवऱ्यानंही मोठ्या मनानं स्वीकारलं होतं. त्यात काही गैर, वावगं वाटण्यासारखं नव्हतंच मुळी! यथावकाश त्याचंही लग्न झालं. त्याची बायको मात्र त्याला शोभण्यासारखी अजिबात नव्हती. कसलीच आवड नव्हती तिला. घरच्यांनी ठरवलं आणि झालं. त्यात त्यान का कोण जाणे कसलाच हस्तक्षेप केला नाही. जे आयुष्य वाट्याला आलं ते स्वीकारलं. मी माझ्या संसारात रमले. आपल्या देशात आला कि माझ्यासाठी भरपूर वेळ काढायचा. विचारांचं शेअरिंग व्हायचं.



एक दिवस कायमचा भारतात परत आला. आला पण तो दुसऱ्याच देशाचा व्हिसा घेऊन ! त्याला ल्युकेमिया झाला. पण चेहरा सतत टवटवीत. कदाचित मरणाशीही दोस्ती केली होती त्याने. म्हणूनच मृत्यूलाही तो हवाहवासा वाटला नसेल? खळखळून हसणारा, भरभरून आयुष्य जगणारा, जातानाही तितकाच हसत गेला. म्हणूनच अजूनही वाटतं

सिर्फ़ एहसास है ये रूह से महसूस करो

प्यार को प्यार ही रहने दो कोई नाम न दो,

या नात्याला नाव तरी कुठल देणार मी?

# भाग्य

हायवेवरच्या राम भरोसे ऑटो गॅरेजमध्ये आज खूप गडबड चालली होती. गॅरेजचा मालक मोठ्या खुशीत दिसत होता. बऱ्याच दिवसांनी गॅरेजमध्ये आज जवळ जवळ पन्नास एक हजाराचे काम मिळाले होते. इतके दिवस हातावर हात धरून बसलेला मिश्रा आज भराभर हाताखालच्या मेस्त्रीला ऑर्डर्स देत होता. गाडीच्या पत्र्याचे ठाक ठूक करणे चालू होते. गाडीच्या हत्यारांचे, अवजारांचे खाण खाण आवाज चालू होते. आज एकदम दोन गाड्यांचे काम करायला मिळाले म्हणून मिश्रा खुशीत होता. काम बरेच दिवस चालणार होते.

मिश्रा माझा नेहमीचाच मेस्त्री. जाता येता हायवेवर थांबून त्याच्या शेजारच्या टपरीवर चहा भजी मारून पुढे जाण्याचा माझा शिरस्ता. आज आपला मित्र खुश तर आपणही खुश. त्या खुशीत मिश्रानं दोन कप चहा पाजला मला. गप्पा टप्पा मारून गावाच्या दिशेने निघालो. मिश्राला काम मिळाले याचा आनंद माझ्याही मनावर स्वार होता.

गाड्या कशाला बघायला जायचे म्हणून स्टार्टर मारला आणि निघालो. गावात पोचलो. मित्राच्या घरात हलकल्लोळ माजला होता. घराबाहेर गर्दी जमली

होती. माझ्या काळजाचा ठोका चुकला. मित्र आणि त्याची बायको धाय मोकलून रडत होती. नवीन गाडी घेऊन मित्राचा मुलगा हायवेवर फेरफटका मारायला गेला होता. सोबत चार सवंगड्यांना घेऊन. धुक्यामुळे समोर उभा असलेला ट्रक त्याला दिसला नव्हता. नवीन गाडी चालवण्याचा मोह त्याचा जीव घेऊन गेला होता.

कुणीतरी सांगत होता. तिहेरी अपघात झाला होता. थांबलेल्या ट्रकवर गाडी जाऊन आदळली होती. ट्रकवर आदळलेल्या गाडीतले पुढचे दोघेजण जगाच्या जागी गेले. पाठीमागच्या तिघांना जवळच्या गावातल्या दवाखान्यात दाखल केले होते. त्यापाठोपाठ आणखी एक चारचाकी त्या गाडीवर आपटली होती. ती आपटून बाजूला ढकलली गेली. आणि झाडावर आपटली. त्या गाडीचे काम मिश्राकडे चालू होते. मित्राच्या गाडीचे काम दुसरीकडे चालू होते. ते राम भरोसेपासून चार किमी अंतरावर होते. मिश्राच्या दोन कप चहाची गोड चव क्षणार्धात कडवट झाली होती.

# आपलं माणूस

उल्हासनं तिला स्वीकारलं होतं. पण अजून नेहाच्या मनात मात्र तिच्याविषयी कटुता होती. तिची पोटची मुलगी असूनही तिला क्षमा करू शकली नव्हती. केवढी मोठी घोडचूक तिने केली होती. नक्कीच! नेहाच्या दृष्टीतून ती फार मोठी चूक होती. काही काळासाठी तिचा तोल ढळला होता. जेव्हा खरी परिस्थिती उमगली तेव्हा ती मागे फिरली. अगदी पूर्ण तन मनाने! पण मुलीने तिला झिडकारावं हा सल तिला बोचत होता. नेहा जाणती होती. पण आता बाबाचा आधार तिला महत्वाचा वाटत होता. आपण जन्म देऊनही इतक्या परक्या कशा झालो याच तिला राहून राहून आश्चर्य वाटत होतं. सकाळपासून नेहाच्या डब्याची तयारी, नाश्तापाणी सगळ काही ती निगुतीनं करत होती. अगदी पूर्वीसारखंच! पण तरीही नेहाच वागण तुटक होतं. ते तिच्या काळजाला घरं पाडायचं.

ती जेमतेम आठवडाभर घरापासून दूर होती. तेवढ्यात उल्हासही खूपच स्वावलंबी झाला होता. नेहासुद्धा. तिची गरज, जी पूर्वी पावलोपावली वाटत होती. ती आता जरासुद्धा उरली नव्हती. पण तिचा आपल्या संसारातला गुंतलेला जीव निर्लज्जपणे त्या दोघांसाठी काही करू पहात होता. दोघानाही तिने काही विचारलेल्या प्रश्नाच उत्तर मिळेलच असं नव्हतं. उल्हास नेहासमोर थोडासा आपलेपणा तिच्याशी दाखवायचा. पण त्यानही अलिप्तता स्वीकारली होती. पूर्वी

मैत्रिणीविषयी, शाळेतल्या गोष्टी भरभरून बोलणारी लेक आता तिला फक्त हो किंवा नाही एवढाच प्रतिसाद देत होती. तिची मानसिक अवस्था ना घर का ना घाट का अशी झाली होती. बाप लेकीन आपल्याला घालून पाडून बोलाव, आपल्यावर भरपूर तोंडसुख घ्याव पण एकदाच हे शीतयुद्ध थांबावाव असं तिला मनापासून वाटत होतं. उल्हास तर तिला आपल्या घरात आसरा दिला हेच खूप झालं अशा रीतीने वागत होता.



वर्ष झालं तरी हा तिढा काही सुटत नव्हता. काय करावं तिला सुचत नव्हतं. तिने स्वत:ला जवळ जवळ घरात कोंडूनच घेतलं होतं. कधीतरी, जगणच नकोसं वाटायचं. कशासाठी आणि कुणासाठी जगायचं हा प्रश्न तिला पडत होता. मनाच्या अशा निराश अवस्थेत तिला एकदा अंगात कणकण जाणवली. तरीही ती रोजची कामं करत राहिली. तब्बेत बरी नाही हे मुद्दाम दोघांना सांगाव असं काही तिला वाटलं नाही. ना त्या दोघांनीही तिची विचारपूस केली. पण त्या दिवशी तिला अगदीच उठवेना. ताप खूपच वाढला. अंथरुणातून उठण्याच त्राण तिच्यात नव्हतं. बराच वेळ दोघांनीही तिची चौकशी केली नाही. खूप वेळ झाल्यावर तिला विचारलं तेव्हा तिन ताप आल्याच सांगितलं. आता काय करावं हा दोघाना प्रश्न पडला. नेहाने तिच्या कपाळावर हात ठेवून बघितलं आणि तिच्या मनाचा बांध फुटला. ती ओक्साबोक्शी रडायला लागली. सगळच तिला असह्य झालं होतं. त्यात तापही होता. तिचं मन आणखीनच हळव झालं होतं. मला एवढी मोठी शिक्षा का देताय? या प्रश्नाला मात्र नेहा उसळून आली आणि तिचा राग आईच्या बेजबाबदारपणावर वाट्टेल तसे ताशेरे झोडू लागला. त्याच्यासाठी मला आणि बाबाना सोडून गेलीस तेव्हा आम्ही कुठला अपराध केला होता? यावर तिच्याकडे

बोलण्यासारखे काहीच नव्हते. पण ती समर्थन करत राहिली. तुमच्या ओढीनेच तर मी परत आले.

भरभरून तोंडसुख घेतल्यावर नेहाचा राग ओसरला. संतापाचा उद्रेक काबूमध्ये आला. ती शांत झाली. आईची अगदी अग्नीपरीक्षाच जणू तिने घेतली होती. वर्षभर आईला मन मारून जगायला लावले होते. झाली एवढी शिक्षा पुरे झाली असं नेहाला वाटलं. उपेक्षितेचे जिणे ती शिक्षा म्हणून सोसत होती. तिच्या चेहऱ्यावरून हात फिरवत नेहा उद्गारली, आता नाही ना आम्हाला सोडून कुठे जाणार? आपल्या माणसाना सोडून जाण्याच दु:ख काय असतं हे मी तुम्हाला सोडून गेल्यावर कळलं. आता मी तुम्हाला सोडून कुठेच जाणार नाही. ती अगदी मनोमन म्हणत राहिली. शरीराने दूर जाण्यापेक्षा मनान दूर गेल्याच दु:ख काय असतं हे तिला आता कळलं होतं.



## लेखिकेची ओळख :

नावः सौ. सविता कौस्तुभ नाबर.

ई मेल : savitanabar@gmail.com फोन : 8149658022

पत्ता: 1752/ 302 नाबर संकुल, 5th क्रॉस, राजारामपुरी मेन रोड, कोल्हापूर ४१६००८

शिक्षण: M.Com.

इतर: Dip.in Music (vocal) – शिवाजी युनिवर्सिटी

Dip.in Music (Tabla) मुंबई युनिवर्सिटी. तबल्याचे शिक्षण कै. केशवराव धर्माधिकारी, पं. विभव नागेशकर, सध्या श्री. महेश देसाई यांच्याकडे सुरु आहे.

सांताक्रूझ इथल्या The Yoga Institute, Santacruz इथे योग प्रशिक्षकाचा कोर्स केला. योग प्रशिक्षक म्हणून अनेक ठिकाणी काम. आर्य विद्या मंदीर मुंबई, सेंट फ्रान्सिस मॅनेजमेंट institute, मुंबई इथे योग शिक्षक म्हणून काम. अनेकाना उपचारयुक्त योग शिकवला.

मुक्त पत्रकार म्हणून गेली २२ वर्षे कार्यरत. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकप्रभा, तरुण भारत, लोकमत, पुण्यनगरी, सा. विवेक यामध्ये अनेक विषयांवर लेखन, लोकमत, अंतर्नाद यासारख्या अनेक दिवाळी अंकांमध्ये लेखन, परिसंवाद.

खालील पुस्तके प्रकाशित------

१. वर्क १०१ –अनुवाद (ले. एलिझाबेथ फ्रीडमन)

२. कृतार्थ मी-- ॲड. वसंतराव नार्वेकर यांचे चरित्र

३. सवाल जबाब पत्रकाराशी –पत्रकार सुभाष धुमे यांच्यावरील मुलाखतीचे पुस्तक

४. सामर्थ्य आहे चळवळीचे- देवदासी निर्मुलन चळवळीचे अध्वर्यू प्रा. विठ्ठल बन्ने यांचे आत्मचरित्र शब्दांकित

५. माईंड पॉवर –प्रेरणादायी पुस्तक


६. स्वत:ला ओळखा—प्रेरणादायी पुस्तक


७. हाऊ टू बिकम सक्सेसफुल—प्रेरणादायी पुस्तक


८. ग्रॅब द ऑपॉर्च्युनिटी----प्रेरणादायी पुस्तक


९. सक्सेस पासवर्ड-----प्रेरणादायी पुस्तक














सवाल-जवाब
पत्रकाराशी
सविता नाबर


सविता नाबर
हाऊ टू बिकम
सक्सेसफुल


ग्रॅब द
अपॉर्च्युनिटी
सविता नाबर
FINISH


सामर्थ्य आहे
चळवळीचे !
विठ्ठल बन्ने


वर्क 101


कृतार्थ मी!
श्री.वसंतराव नार्वेकर यांचे आत्मचरित्र
सविता नाबर

# ई साहित्य प्रतिष्ठान



मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यंच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट . कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.